# जिल्हा निवड समिती, वर्धा

## शिक्षक भरती जाहिरात

## अनुसूचित जमाती उमेदवारांकरीता विशेष भरती मोहिम-2019

## संस्थेचे नांव :- (2701EO01) जिल्हा परिषद, वर्धा

जिल्हा परिषद, वर्धा येथील अनुसूचित जमातीकरीता राखीव असलेली गट-क मधील सरळसेवेची रिक्त पदे भरण्यास विशेष भरती मोहिम 2019 अंतर्गत खालील रिक्त पदे सरळसेवेने भरण्यासाठी पात्रता धारण करीत असलेल्या अनुसूचित जमातीच्या पात्र उमेदवाराकडून अर्ज मागवित आहो.

**भरती प्रक्रीया संदर्भातील सविस्तर जाहिरात www.zpwardha.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.**

**शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता, विषय व पद निहाय पदांचा तपशिल**

| अ. क्र. | पद | वेतनश्रेणी/ मानधन | विषय | शिकवण्याचे माध्यम | आवश्यक शैक्षणिक पात्रता व व्यावसायिक पात्रता | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | शिक्षण सेवक प्राथमिक (वर्ग 1 ते 4/5) | एकत्रित मासिक मानधन (3 वर्षाकरीता) रुपये 6000/- प्रती महिना | सर्व विषय | मराठी | अ) i)मान्यता प्राप्त मंडळाची किमान 50% गुणांसह उच्च माध्यमिक (किंवा समकक्ष) परीक्षा उत्तीर्ण आणि मान्यताप्राप्त संस्थेची प्राथमिक शिक्षणशास्त्र दोन वर्षाची पदविका (D.T.ED) उत्तीर्ण (त्यास कोणतेही नाव दिले असो) किंवा<br>ii)राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेच्या (National Council for Teacher Education) (Regulations, Norms and Procedure), Regulations, 2002 नुसार मान्यता प्राप्त मंडळाची किमान 45% गुणांसह उच्च माध्यमिक (किंवा समकक्ष) परीक्षा उत्तीर्ण आणि मान्यताप्राप्त संस्थेची प्राथमिक शिक्षणशास्त्र दोन वर्षाची पदविका उत्तीर्ण (त्यास कोणतेही नाव दिले असो) किंवा<br>iii) मान्यताप्राप्त मंडळाची किमान 50% गुणांसह उच्च माध्यमिक (किंवा समकक्ष) परीक्षा उत्तीर्ण आणि मान्यताप्राप्त संस्थेची चार वर्षाची प्राथमिक शिक्षणशास्त्र पदवी (Bachelor of Elementry Education) उत्तीर्ण. किंवा<br>iv) मान्यताप्राप्त परीक्षा मंडळाची किमान 50% गुणांसह उच्च माध्यमिक (किंवा समकक्ष) परीक्षा उत्तीर्ण आणि मान्यता प्राप्त संस्थेची शिक्षणशास्त्र विषयात दोन वर्षाची पदविका (विशेष शिक्षण) किंवा<br>v) मान्यताप्राप्त विद्यापिठाची पदवी आणि मान्यताप्राप्त संस्थेची शिक्षणशास्त्र दोन वर्षाची पदविका उत्तीर्ण (त्यास कोणतेही नांव दिले असो) किंवा<br>vi) शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.टिसीएम-2009/36/09/माशि-4 दि. 10 जून 2010 अन्वये उच्च माध्यमिक शालांत परिक्षेच्या (MCVC) शाखेंतर्गत कृषी गटातील Horticulture and Crop Science आणि आरोग्य वैद्यकिय सेवा गटातील Crench and Pre School Management परीक्षा उत्तीर्ण आणि मान्यता प्राप्त संस्थेची शिक्षणशास्त्रात दोन वर्षाची पदविका<br>आणि<br>ब) राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद, (NCTE) यांच्या मार्गदर्शक तत्वानुसार केंद्र शासन किंवा महाराष्ट्र शासनाव्दारे आयोजित शिक्षक पात्रता परीक्षा (Teacher Eligibility Test) उत्तीर्ण | 20 |

**समांतर आरक्षण निहाय रिक्त पदांचा तपशिल**

| अ. क्र. | प्रवर्ग | महिला | माजी सैनिक | अंश कालीन | प्रकल्प ग्रस्त | भूकंप ग्रस्त | खेळाडू | अंध/बधीर/ अस्थिव्यंग | अनाथ | एकुण समांतर आरक्षण | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त उर्वरित पदे | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | प्राथमिक शिक्षण सेवक (वर्ग 1-4 ते 5) अनु.जमाती | 06 | 03 | 02 | 01 | 00 | 01 | 01 | 00 | 14 | 06 | 20 |
| | एकुण | 06 | 03 | 02 | 01 | 00 | 01 | 01 | 00 | 14 | 06 | 20 |

Scanned by CamScanner

टिप :- भरती प्रक्रियेमधील एकूण रिक्त पदाच्या संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार तसेच भरती प्रक्रीया स्थगित करणे किंवा रद्द करणे, परीक्षेचा प्रकार, समांतर आरक्षणात अंशत: बदल करणे तसेच भरती प्रक्रियेतील वाद /तक्रारी बाबत अंतीम निर्णय घेण्याचा अधिकार जिल्हा निवड समिती, वर्धा यांना राहील.

**सर्वसाधारण सूचना**

1.केवळ जात वैधता प्रमाणपत्र धारण करणाऱ्या उमेदवारच नियुक्तीस पात्र राहतील.

1. वरील पदाकरीता ईच्छुक व अर्हता धारण करणारे उमेदवार यांनी जाहिरातीच्या अनुषंगाने जिल्हा निवड समितीकडे (शिक्षण विभाग, प्राथमिक) जिल्हा परिषद, वर्धा दिनांक 6 जानेवारी 2020 सायंकाळी 5.45 वाजेपर्यंत अर्ज सादर करावे.
2. वरील पदासाठी अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी (TAIT) परीक्षेपूर्वी TET(शिक्षक पात्रता परीक्षा) उत्तीर्ण असणे अनिवार्य आहे.
3. वरील शिक्षण सेवकांची भरती ***अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी*** (TAIT) यामध्ये मिळालेल्या गुणाच्या आधारावर करण्यात येईल.
4. उमेदवारांकरीता वयोमर्यादा ही शासनाने वेळोवेळी विहीत केल्याप्रमाणे राहील.
5. अर्जाची छानणी केल्यानंतर पात्र व परिपूर्ण कागदपत्रे सादर केलेल्या उमेदवारांचीच निवड करण्यात येईल.
6. उमेदवारांनी विहित नमुन्यातच अर्ज सादर करावे. विहीत नमूना जिल्हा परिषद, शिक्षण विभाग, प्राथमिक वर्धा येथे अर्जाचा नमूना उपलब्ध आहे. तसेच जिल्हा परिषद आणि जिल्हाधिकारी, वर्धा यांचे वेबसाईटवर उपलब्ध आहे.
7. अर्ज स्विकारण्याच्या शेवटच्या दिवशी संध्याकाळी 5.45 वाजेपर्यंत प्राप्त झालेले अर्ज फक्त विचारात घेतल्या जाईल. त्यानंतर आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही. पोस्टाने / कुरीयर व अन्य यंत्रणेव्दारे पाठविलेले अर्ज विलंबाने प्राप्त झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

**स्वा/-**
**(उल्हास नरड)**
**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**जिल्हा निवड समिती**
**जिल्हा परिषद, वर्धा**

**स्वा/-**
**(डॉ. सचिन ओम्बासे,भाप्रसे)**
**सदस्य तथा**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा निवड समिती**
**जिल्हा परिषद, वर्धा**

**स्वा/-**
**(अशोक लटारे)**
**अध्यक्ष**
**जिल्हा निवड समिती**
**तथा जिल्हाधिकारी**
**जिल्हा वर्धा**

Scanned by CamScanner